दे धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १८९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

**आजचा सामना**

CHENNAI SUPER KINGS Vs KOLKATA Knight Riders

चेन्नई वि. कोलकाता

वेळ : ७.३० वा. स्थळ : चेन्नई

# माढ्यासाठी पवार पीचच्या पुढे जाऊन बॅटिंग करणार



## भाजपच्या 'बी' प्लॅनला मात देण्यासाठी 'बारामती प्लॅन' तयार!

✔ बारामती/विशेष प्रतिनिधी

**माढा लोकसभा मतदारसंघात मोहिते पाटलांच्या पराभवासाठी भाजपाने सशक्त 'बी प्लॅन' तयार ठेवला असला तरी त्यावर मात करण्याचा खास 'बारामती प्लॅन' ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी तयार केला असल्याची माहिती रविवारी 'सुराज्य'च्या हाती लागली आहे. या 'बारामती प्लॅन'विषयी कमालीची गुप्तता पाळण्यात आली असली तरी माढ्याची जागा जिंकण्यासाठी शरद पवार स्वत: पीचच्या पुढे जाऊन बॅटिंग करणार असल्याची माहिती आहे.**

महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला महाराष्ट्रातून विविध ठिकाणी लढण्यासाठी दहा जागा देण्यात आल्या आहेत. त्या प्रत्येक जागेवर शरद पवार यांचं खास लक्ष आहे. त्यातही बारामती, सातारा आणि माढा हे तीन लोकसभेचे मतदार संघ पवारांनी आपल्यादृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेचे केले आहेत. याच पार्श्वभूमीवर, सातारा आणि माढा या ठिकाणचे तीन वेळा सर्व्हेक्षण त्यांनी करुन घेतलं आहे.

माढा लोकसभा मतदार संघात भाजपासोबत लढत देताना लोकमताचा कल काय आहे? या मतदार संघामधील कोणत्या तालुक्यात भाजपला अधिक समर्थन मिळण्याची शक्यता आहे. त्या तुलनेत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला विधानसभेच्या कोणत्या मतदार संघात अधिक मताधिक्य मिळू शकतं? खास करुन बाब म्हणजे फलटणचे संजीवराजे निंबाळकर, सांगोल्याचे डॉ. अनिकेत देशमुख, म्हसवडचे अभयसिंह जगताप आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यामध्ये कोणता उमेदवारीचा चेहरा सरस ठरेल, याबद्दलचा कौलदेखील शरद पवार यांनी सर्वेक्षणातून जाणून घेतला.

उमेदवारीच्या आघाडीवर तुलनेत अकलूजकर मोहिते-पाटील यांना संपूर्ण मतदार संघातून जनमताचा कौल जादा असल्याची ठळक बाब शरद पवार यांच्यासमोर शेवटच्या तीन सर्व्हेक्षणातून आली. याच आधारे मोहिते-पाटील यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करुन धैर्यशील मोहिते-पाटील यांना माढ्याच्या आखाड्यात उतरविण्याच्या निर्णय शरद पवार यांनी घेतला असून मोहिते-पाटील यांची जागा निवडून आणण्यासाठी सगळी शक्ती पणाला लावण्याची रणनिती आखल्याचे सांगण्यात आले.

### पवारांची मोहिते-पाटील यांच्यासाठी पीचच्या पुढे जाऊन बॅटिंग

ज्या लोकसभेच्या जागेवरुन संसदेत नेतृत्व केलं, त्या माढ्याच्या जागेवर शरद पवार यांचे आजवर कायमचे लक्ष राहिले. या मतदार संघाची खडान्‌खडा माहिती त्यांना आहे. या मतदार संघात त्यांची हक्काची माणसं आहेत. या मतदार संघात केलेलं काम आहे. इथली भाजपची जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या वर्चस्वाखाली घेताना धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठिशी मताधिक्याची ताकद लावताना शरद पवार यांनी अगदी पीचच्या पुढं जाऊन बॅटिंग करण्याची तयारी दर्शवल्याची माहिती मिळाली आहे. आपलं इप्सित साध्य करण्यासाठी शरद पवार यांनी यापूर्वी अनेक डाव-प्रतिडाव टाकले. रणनिती आखून जे काही साध्य करायचं ते केले. मोहिते-पाटील यांच्या रुपानं माढ्याची जागा जिंकून आणताना शरद पवार हे सर्वशक्तीनिशी आपली ताकद लावणार आहेत, असं सांगण्यात आलं.

### साहेबांना खात्री विजयदादांची पुण्याई फळाला

शरद पवार यांनी माढा लोकसभेचं ज्या वेळी ग्राऊंडलेव्हल तीन वेळा सर्व्हेक्षण करुन घेतलं, त्याचा अहवाल पाहिला त्याशिवाय माढा लोकसभा निवडणूक लढायचीच या इर्षेने पेटलेले ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांनी जेव्हा मतदार संघात अनेक गावांमध्ये दौरे काढले, त्या दौऱ्यांवेळी विजयदादा यांचं झालेलं मनस्वी स्वागत, आम्ही आपल्यासोबत आहोत असा प्रत्येक ठिकाणी मिळालेला शब्द, विजयदादांच्या दौऱ्यांमुळे मोहिते-पाटील परिवाराला मिळणाऱ्या सहानभूतीचा उठलेला माहोल याची जेव्हा शरद पवार यांनी माहिती घेतली, बारकाईने अभ्यास केला, त्यावेळी विजयदादा यांची पुण्याई धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या लोकसभा लढण्यासाठी फळाला येईल, हे शरद पवारांच्या प्रकर्षानं लक्षात आल्याचीही माहिती समोर आली आहे.

# रणजितदादांची 'ती' पोस्ट अन् तुफानी चर्चेचं वादळ

सोलापूर : लोकसभा निवडणुकीच्या रणधूमाळीत अत्यंत महत्वाच्या निर्णायक टप्प्यावर मोहिते-पाटील परिवार आहे. भाजपचं 'कमळ' बाजूला सारुन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची 'तुतारी' हातात घेण्याची समीप घटिका या परिवाराची काही दिवसांवर आली आहे. याचदरम्यान या परिवारातील रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी भाजपच्या स्थापना दिनाची पोस्ट व्हायरल केली. या पोस्टमुळं तुफानी चर्चेचं नवं वादळं आलं. मोहिते-पाटील परिवारातील सर्व सदस्य हे शरद पवार गटात सामील होत असताना रणजितदादा मात्र भाजपामध्ये राहणार असल्याचं या पोस्टमधून अधोरेखित होत असल्याचं मानलं जातंय. रणजितदादांच्या यांच्या व्हायरल पोस्टवर अनेकांच्या प्रतिक्रियादेखील येताहेत.




रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केलेली पोस्ट

### रणजितदादांनी दिलेल्या 'या' शुभेच्छा

**सशक्त भाजपा**

सुराज्य, सुशासन, विश्वास, संघटन, कार्यकर्ता ही ओळख असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनाच्या निमित्तानं सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांना शुभेच्छा!

या शुभेच्छा त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे अध्यक्ष जे.पी.नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठिवल्या आहेत.

### रणजितदादांच्या शुभेच्छांवर 'या' निवडक प्रतिक्रिया

- दादा, मानलं तुमच्या धैर्य व सद्‌सद्‌विवेकाला
- 'कुंटुंबात एवढी राजकीय उलथापालथ होतेय पण तुम्ही संयम न सोडता पक्षनिष्ठा इमानदारपणे जपताय. मोहिते-पाटील घराण्यावर झालेला अन्याय पक्ष नेतृत्वाच्या पण लक्षात आला असेल. भविष्यात तुम्ही नक्कीच पक्षात मोठे व्हाल.'
- 'द्या सोडून अस्त्विाची लढाई आहे. ज्या सातपुतेला निवडून आणले ते तरी आपल्या मागे राहिले का...जर अस्तित्वच धोक्यात असेल तर पक्षाला काय पुजायचं का...'
- 'ज्यांनी आदरणीय दादांच्या महत्त्वकांक्षी असलेला कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेच्या प्रकल्पास मंजूरी दिली... त्या पक्षाला सोडू नका... आणि भविष्य नसलेल्या पक्षात जाऊ नका ही प्रामाणिक इच्छा..!'


# अर्चना पाटील यांच्या विधानाने सावंत समर्थकांच्या संतापात वाढ

✔ परंडा/सुहास मस्के

**बार्शीत अर्चना पाटील यांनी आमदार राजेंद्र राऊत यांच्यामुळेच आपणास भाजपची उमेदवारी मिळाली, असे आज थेटच सांगितले. त्यामुळे सावंत समर्थकांचा रोष आमदार राऊत यांच्यावर आल्याचे मानले जात आहे. धाराशीव लोकसभेच्या उमेदवारीवरुन सावंत अणि राऊत यांच्यात नवा संघर्ष सुरु होणार का? अशी चर्चा आहे.**

### कालची बैठक रद्द

धनाजी सावंत यांना धाराशीव लोकसभेची उमेदवारी नाकारल्यावरुन संतापलेल्या सावंत गटाची बैठक काल शनिवारी बोलावण्यात आली होती. मात्र आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांना मुंबईतील पक्षामध्ये चाललेल्या वेगवान घडामोडीमुळे धाराशीवच्या दौऱ्यावर येणे शक्य झाले नाही, त्यातून कालची बैठक रद्द झाल्याचे सांगण्यात आले.









धाराशीव लोकसभेची उमेदवारी नाकारल्यावरुन धनंजय सावंत कोणती भूमीका घेतील, याबद्दल अनेक अंदाज लावले जात आहेत. विशेषत्वे, मंत्रीपद टिकवण्यासाठी प्रा. डॉ. तानाजी सावंत बंड म्यान करणार का याची उत्सुकता असतानाच राऊत अन् सावंत अशा नव्या संघर्षाचा अध्याय सुरु होतो का याचीदेखील चर्चा सुरु झाली आहे. अर्चना पाटील यांच्या विधानाने जणू काही आगीत तेल ओतण्याचा प्रकार झाल्याचे मानले जात आहे. त्यांच्या विधानामुळे सावंत समर्थकांच्या संतापात अधिक भर पडल्याचे सांगण्यात येते.

मंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय यांना लोकसभेच्या उमेदवारीसाठी मुख्यमंत्र्यांकडे मागणी करूनही आमदार राणा जगजितसिंह यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना आयात करून दिलेली उमेदवारी यामुळे सावंत समर्थक अस्वस्थ आहेत. आपण बंडखोरी करायची की युतीधर्म पाळायचा याबाबत कार्यकर्त्यांची मते डॉ. सावंत ऐकून आपला निर्णय घेणार आहेत. बुधवारी (ता.१०) डॉ. तानाजी सावंत हे समर्थकांना भेटणार आहेत. तथापि, सावंतांचा राजकीय अश्वमेध रोखण्याचा प्रयत्न केला कोणी? याबाबत उलट-सुलट चर्चा असून सावंत समर्थकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सावंत गट बंडाचे निशाण फडकावण्यावर कायम राहणार की दिलजमाई करणार याचा अंतिम फैसला बुधवारी होऊ शकतो, असे खात्रीलायकरित्या सांगण्यात आले.

महायुतीतून धनंजय सावंत यांना उमेदवारी दिल्यास त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी घेण्याचे वचन प्रा.डॉ. तानाजी सावंत यांनी दिले होते. मात्र, ते स्वत: निवडणूक लढवत असतील तरच त्यांना उमेदवारी देण्याचा पवित्रा घेण्यात आला. त्यानंतर हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आला. सावंत यांनी लोकसभा जिंकल्यास शिंदे सेनेचा वारू जिल्हा भरात पसरेल. त्यामुळे त्यांच्या राजकीय वाटचालीला खोडा घालण्याचा प्रयत्न या निमित्ताने केल्याचे शिवसैनिकांचे (शिंदे गट) म्हणणे आहे.

धनंजय सावंत यांना जर उमेदवारी मिळाली नाही आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दबाव आणून उमेदवारी मागे घ्यायला लावली तर युतीच्या उमेदवाराला पाठिंबा असणार का? अर्चना पाटील यांच्यासाठी काम तरी कसे करायचे असा प्रश्न सावंत समर्थकांमध्ये आहे. त्यामुळे डॉ. सावंत अशा संतप्त समर्थकांची कशी समजूत काढतात हे पहावे लागेल.

# धनुष्यबाण झेपेना मशाल काही पेटेना!

**सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीसाठी भाजप आणि काँग्रेसकडून जोरदार प्रचार यंत्रणा राबवली जात आहे. मात्र, या दोन्ही पक्षाचे मित्र असलेले शिवसेनेचे दोन्ही गट प्रचारात मात्र सक्रिय दिसत नसल्याचे चित्र आहे. भाजपकडे एकनाथ शिंदे यांचा शिवसेना गट आहे. तर काँग्रेसकडे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा गट आहे. मात्र या दोन्ही सेना प्रचारात कोठेच दिसत नाहीत. या निवडणुकीत अद्याप युतीचा धर्म पाळताना धनुष्यबाळ काय झेपेना अन् मशाल काय पेटेना हे वास्तव दिसत आहे. त्यामुळे भाजपसाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा गट उपयोगी ठरेल का तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या मशालीच्या प्रकाशाचा फायदा काँग्रेसला होणार हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे.**









सोलापुरात भाजपकडून आमदार राम सातपुते तर काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांच्यात लढत होत आहे. या दोघांना आपले मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेची किती मदत होणार याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आमदार राम सातपुते यांनी शिवसेनेचे संपर्कप्रमुख शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख मनीष काळजे, शहर प्रमुख अमोल शिंदे यांच्यासह नुकतेच आलेले शिवसेनेचे सचिव संजय माशिलकर यांची भेट घेतली होती. त्यावेळी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार सातपुते यांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले खरे. मात्र अद्याप ते प्रचारात कोठेही सहभागी असल्याचे चित्र दिसत नाही.

दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत असलेले दिलीप कोल्हे ही सध्या शांतच दिसत आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतही दोन गट आहेत. अमोल शिंदे आणि मनीष काळजे यांच्यात फारसे सख्य नाही. त्यामुळे हे दोघे एकत्र येऊन प्रचार करणार का, याबाबतही तर्क-वितर्क लढवत आहेत. यातून भाजपचे नुकसान होऊ शकते अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. काँग्रेसचा मित्र पक्ष असलेल्या उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेतील नेतेही प्रचारात सक्रिय नाहीत. ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेऊन आमदार प्रणिती शिंदे यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे.शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या पुढील काळात सुशीलकुमार शिंदे शिवसेनेला सहकार्य करतील का असा प्रश्न केला आहे. यानंतर जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम बरडे,गणेश वानकर यांच्यासह पदाधिकारी प्रचारात अद्याप सक्रिय नाहीत.

ठाकरे यांची सोलापुरात सभा होणार आहे त्यानंतर शिवसेनेचे पदाधिकारी सक्रिय होतील असे बोलले जात आहे. शहरातील तिन्ही मतदारसंघात शिवसेनेची म्हणावी तितकी ताकद नाही. महापालिकेत शिवसेनेला दुहेरी आकडाही गाठता आला नाही. महेश कोठे यांच्यामुळे गेल्या निवडणुकीत शिवसेनेचे २१ नगरसेवक निवडून आले होते. जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांचा त्यांच्या देगाव परिसरात चांगला होल्ड आहे. तेथेच काँग्रेसला जास्त मदत होईल असे बोलले जाते. इतरत्र मदतीबाबत साशंकता आहे. अशातच शिवसेनेचे दोन गट पडले आहे. त्यामुळे शिवसेनेची ताकद भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षाच्या मध्ये विभागली जाणार आहे.

### ठाकरे गटाची मते काँग्रेसला जाणार का?

आज गेल्या पंचवीस वर्षांपासून भाजप आणि शिवसेनेची युती होती. त्यामुळे जागा वाटपानुसार भाजपची मते शिवसेनेला आणि शिवसेनेचे मते भाजपला मिळत होती. मात्र, सध्या शिवसेनेचे दोन गट पडले आहेत. एकनाथ शिंदे यांचा गट भाजपच्या बाजूने आहे तर दुसरा उद्धव ठाकरे यांचा गट काँग्रेसच्या बाजूने आहे. सोलापुरात आत्तापर्यंत शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी 'कमळा'लाच मतदान केले आहे. यंदा प्रथमच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला काँग्रेसला मतदान करावे लागणार आहे. त्यामुळे शिवसेनेचे पदाधिकारी काँग्रेसला म्हणजेच हाताला मतदान करणार का? की ऐनवेळी हिंदुत्वाचा विचार करत भाजपकडे वळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### काही लक्ष्यवेधी नोंदी...

- एकनाथ शिंदे शिवसेनेच्या विभागलेले दोन्ही गट एकत्र होऊन भाजप उमदेवाराच्या पाठिशी ताकद लावणार का?
- युतीचा धर्म पाळण्यातून सहयोगी मित्र पक्षाच्या उमेदवाराचे काम करण्याचे वरिष्ठांनी आदेश देऊनही स्थानिक नेते होईनात प्रचारात सक्रिय
- या खेपेस पहिल्यांदाच शिवसैनिकांवर भाजपऐवजी काँग्रेसच्या उमेदवारास मतदान करण्याची वेळ
- माजी उपमहापौर दिलीप कोल्हेदेखील अद्याप निवडणुकीपासून दूर असल्याचे चित्र

### दिलीप कोल्हेंच्या भूमिकेवर लक्ष



पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे नेते दिलीप कोल्हे हे सध्या एकनाथ शिंदे शिवसेना गटात आहेत. सुशीलकुमार शिंदे यांच्याशी त्यांचे अत्यंत घनिष्ट संबंध आहेत. मागील एका विधानसभेच्या निवडणुकीवेळी शहर मध्य मतदार संघात राष्ट्रवादीने विद्या लोलगे यांना उमेदवारी दिली होती. कोल्हे यांनी लोलगे यांचे काम न करता सुशीलकुमार यांच्या आग्राखातर प्रणिती यांचे काम केल्याचा आरोप झाला. याच्या तक्रारी शरद पवार यांच्यापर्यंत पुराव्यानिशी केल्या. मागील निवडणुकीचा संदर्भ कोल्हे यांच्याबाबतीत या निवडणुकीशी लावला जात आहे. कोल्हे हे शिंदे गटात असल्यानं त्यांची ताकद भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्या पाठिशी लागणे अनपेक्षित आहे. पण मागील विधानसभेच्या पॅटर्न कोल्हे यांच्याकडून राबतो का, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.